श्रीरामपूर तालुक्याचा इतिहास (1947 ते 2007)

SHRIRAMPUR TALUKYACHA ITIHAS (1947 To 2007)

A

SYNOPSIS / RESEARCH PROPOSAL

SUBMITTED TO THE

SHRI JAGDISH PRASAD JHABARMAL TIBREWALA UNIVERSITY,

FOR THE DEGREE

OF

DOCTOR OF PHILOSOPHY

IN

HISTORY

By

Balasaheb Lahanu Badhe
Registration No. 15712196

UNDER THE GUIDANCE OF

Dr. Natha Rambhau Mokate
Reg.No.jjt/2Kg/SSH/778
DEPARTMENT OF HISTORY
SHRI JAGDISH PRASAD JHABARMAL TIBREWALA UNIVERSITY,
VIDYANAGARI, JHUNJHUNU, RAJASTHAN – 333001

Year 2013

1. **Title of Research work:**

श्रीरामपूर तालुक्याचा इतिहास (1947 ते 2007)

SHRIRAMPUR TALUKYACHA ITIHAS (1947 To 2007)

2. **Name of Scholar:** Badhe Balasaheb Lahanu

3. **Subject:** History

4. **Registration No:** 15712196

5. **Name of Guide:** Dr. Natha Rambhau Mokate

Reg.No.jjt/2Kg/SSH/778

6. **Designation:** Assoicate Professor

7. **Guide working place:** B.D. Kale Mahavidyalaya,

Ghodegaon, Tal. Ambegaon, Dist, Pune (Maharashtra)

संशोधनाचे शीर्षकः श्रीरामपूर तालुक्याचा इतिहास (1947 ते 2007)

प्रास्ताविकः

इतिहासाचे स्थळ ,काळ, आणि विषयानुसार प्रकार पडतात.काळानुसार प्रागैतिहासिक, प्राचीन, मध्ययुगीन,आणि अर्वाचीन असे प्रकार आहेत . विषयानुसार आर्थिक इतिहास, सामाजिक इतिहास, राजकीय इतिहास, कला व साहित्यविषयक इतिहास इ.प्रकार पडतात तर स्थ ळानुसार स्थानिक इतिहास, प्रादेशिक इतिहास, राष्ट्रीय इतिहास आणि जागतिक इतिहास असा क्रम लागतो. जागतिक इतिहासातून जगभरातील अशा घडामोडी, घटना अभ्यासल्या जातात की, त्यांचे पडसाद संपूर्ण जगावर पडले आहेत. उदा. फ्रेंच राज्यक्रांती, पहिले महायुध्द,दुसरे महायुध्द इ . राष्ट्रीय इतिहासात त्या त्या देशाच्या वाटचालीवर परिणाम करणाऱ्या घटना,घडामोडी यांचा अभ्यास होतो . उदा . भारताच्या संदर्भात 1857 चा राष्ट्रीय उठाव, असहकार आंदोलन इ . विशिष्ट प्रदेशापुरती व्याप्ती असलेला इतिहास म्हणजे प्रादेशिक इतिहास होय . उदा .मराठयांचा इतिहा स. स्थानिक भूभागापुरता मर्यादीत असणारा स्थानिक समुदायावर   परिणाम करणाऱ्या महत्वपूर्ण घटनांचा अभ्यास स्थानिक इतिहासात येतो . रॉजर्स (1977) यांच्या मते स्थानिक इतिहास म्हणजे ‘‘ समुदाय

म्हणून विकसित होणाऱ्या स्थानिक घटकांच्या महत्वपूर्ण अशा काही भूतकालीन घटनांचा त्याच्या संदर्भात आणि इतर तशा घटकांच्या तुलनेत अभ्यास होय .''

स्टीफन (1977) यांच्या मते छोटी शहरे, ग्रामीण किंवा निमशहरी भाग किंवा शहराच्या लगतचा भाग अशा लहान समुदायाच्या भूतकाळाचा अभ्यास म्हणजे स्थानिक इतिहास होय .

'' स्थानिक इतिहास म्हणजे सर्वसामान्यपणे लहान अंतरातील एका मर्यादीत भागाच्या भूतकाळाचा अभ्यास होय .'' असे म्हणता येईल.

स्लेटेटर (1995) यांच्या मते ''स्थानिक इतिहास हा इतिहासातील कृतिशील अभ्यासाचा सर्वोत्तम आधार होय .''

आजच्या काळात स्थानिक इतिहास संशोधनाच्या लेखनाला विशेष महत्व प्राप्त होत आहे.बदलत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, स्थित्यंतराचे प्रतिबिंब स्थानिक इतिहासात उमटत असते. स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचे एक द्योतक आहे

विशिष्ट मर्यादीत समुदायामध्ये कोणकोणत्या घडामोडी घडल्या, कोणते बदल झाले, याचा सखोल अभ्यास स्थानिक इतिहासातून केला जातो . त्यातून मिळणारे निष्कर्ष हे त्या परिसरातील समस्या सोडविणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकतात . भावी

काळाला मार्गदर्शक ठरू शकतात . एखाद्या विशिष्ट घटकाच्या स्थानिक इतिहासाचे संशोधन हे अन्य भूभागांच्या स्थानिक इतिहास संशोधनाला सहाय्यभूत ठरते . त्यातून इतिहास संशोधनाची उपयुक्तता वाढीस लागते

प्रस्तुत संशोधनामध्ये महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हयातील चौदा तालुक्यांपैकी एक असलेला श्रीरामपूर तालुका अभ्यासासाठी निवडला आहे . बहुसंस्कृत समाज हे वैशिष्ट्य असलेला हा तालुका, अनेक बाबतीत केवळ अहमदनगर जिल्हयातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण ठरतो . वेगवेगळया जातीधर्माचे लोक येथे गुण्यागोविंदाने राहतात . शेती या प्रमुख व्यवसायाबरोबरच शेतीला पुरक उद्योगधंदे तसेच अन्य व्यापार, व्यवसाय, औद्योगिक क्षेत्र,नोकरदार वर्ग अशी संमिश्र अर्थव्यवस्था असलेला हा श्रीरामपूर तालुका नक्कीच वैशिष्ट्यपूर्ण आहे . येथील शेतकरी वर्गाची प्रगती, सहकारी उद्योगसंस्था, साखर कारखानदारी, शिक्षण क्षेत्र, याबाबतची प्रगती अभ्यासता यावी म्हणून संशोध्कांने प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडलेला आहे प्रस्तुत संशोधनातून श्रीरामपूर तालुक्याच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक अशा स्वातं त्र्योत्तरकालीन इतिहासाचा आढावा घेवून श्रीरामपूर तालुक्याच्या सद्यःस्थितीवर प्रकाश टाकता यावा, समस्या समजून घ्याव्यात आणि त्यांची कारणमिमांसा करून भावी काळाच्या

दृष्टीकोनातून समस्यांचे निराकरण कसे करता येईल यासंदर्भात भाष्य करता यावे म्हणून हे संशोधन हाती घेण्यात आले आहे .

संबंधित साहित्याचा आढावाः

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील नागर केंद्राचा उदय, बारामती एक अभ्यास या पीएच.डी प्रबंधंत स्थानिक इतिहासाची संकल्पना मांडुन बारामती शहराचा इतिहास लिहिला आहे. या प्रबंधात शहराचा उदय व विकास होण्यास जबाबदार असलेल्या अनेक घटकांची चर्चा केली आहे. तसेच शहराच्या वाढीसाठी हवे असलेले कारखंनदारीचे महत्व स्पष्ट करुन छोटया छोटया उद्योगधंदयां विषयीचा अभ्यास केलेला दिसून येतो तसेच शंहराच्या विकासास अनुकूल ठरणाऱ्या अनेक बाबींचा आढावा घेंतला आहे व शंहराच्या विकासासाठी शिफारशी ही सुचविल्या आहेत. 1

कृषी उत्पन्न बाजार समिती,श्रीरामपूर या एम.फील पदवी प्रबंधंत श्रीरामपूर तालूक्याचा शेंतकरी,तालुक्यातील शेंतीत पिकणारा शतमाल,शेंतमालाची वाहतुक, शेंतमालाचे भाव यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची भूमिका स्पष्ट करुन शतकऱ्यांना जास्तीत जास्त भाव मिळावा म्हणन कृषी उत्पन्न बाजार समितीने कोणकोणत्या उपाय योजना राबवाव्यात याविषंयी शिफारशी केलेल्या आहेत. 2

भारतातील सहकारी चळवळीची ऐतिहासिक मिमांसा महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हयाचा विशेंष संदर्भ, या पीएच.डी. प्रबंधात अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर तालूक्यातील सहकारी चळवळीचा आढावा घेंतला आहे. पहिला सहकारी साखर कारखंना श्रीरामपूर तालुक्यातील प्रवरानगर येथें सुरु झाला असल्याने श्रीरामपूर तालुक्याचे या संबंधातील महत्व वादातीत आहे. हा अभ्यास शोधकर्त्याने अतिशंय सुक्ष्मपणे मांडला आहे. 3

जुन्नरचा इतिहास – प्राचीन ते अर्वाचिन, या पीएच.डी प्रबंधंत शोध्ंकर्त्याने स्थानिक इतिहास लेखनाच्या मर्यादा व स्थानिक इतिहास लेखंनातील महत्वाचे मुद्ये यांची अतिशय अभ्यासपुर्ण अशी मांडणी केली असून सदर प्रबंधंत जुन्नर शहराच्या जडणघडणीत तेथील भौगोलिक स्थितीचा वाटा स्पष्ट करुन औद्योगिकरणंचा शहराच्या वाढीवर पडलेला प्रभाव ही मांडला असून शहरीकरणंच्या प्रगतीतील समस्यांचा परिहार कसा करता येईल याविष्यी शिफारशी केल्या आहेत. 4

अशोक सहकारी बॅंक लि. श्रीरामपूर एक विश्लेषणात्मक अभ्यास, या एम. फील.पदवी प्रबंधामध्ये श्रीरामपूर तालूक्यातील लोकांना अशोक सहकारी बॅंकेमार्फत कसा कर्जपुरवठा केला जातो. श्रीरामपूर तालुक्यातील लोकांची क्रयशक्ती किती आह` दिलेल्या कर्जाची परतफेड कशी केली जाते. याविष्यी विवेचन केलेले आहे. 5

नागरी सहकारी बॅंकाचे विश्लेष्णंत्मक अध्ययन, विशेंषसंदर्भ – अहमदनगर

जिल्हा,या एम्.फील पदवी प्रबंधात श्रीरामपूर तालुक्यातील एकुण अर्थकारणावर अभ्यास केला असून शेंतकरी,नोकरदार, व्यापारी, मजूर, कामगार या सर्व घटकांच्या आर्थिंक क्षमतेवर चर्चा केली आहे. तसेच नागरी सहाकारी बॅंकांचा व्यापारी वर्गाला फायदा होतोच व त्याचबरोबर सर्व सामान्यांना ही या बॅंका कर्ज पुरवठा करतात त्यामुळेसर्व सामान्यांचीही क्रय शक्ती वाढते. 6

श्रीरामपूर तालूक्यातील कृषी विपणनाच्या समस्यांचा अभ्यास, या एम्.फील पदवी प्रबंधत केलेला आहे. श्रीरामपूर तालुक्याचा शेंती माल कशा पद्वतीने विकला जातो.विशेंष्तः ऊस शेंतीच्या समस्या व ऊसाचे नियोजन साखंर कारखंन्यांची भूमिका यांचा अभ्यास केला असून कृषि विपणन कसे प्रभावी होईल याविष्यी मार्गदर्शन केले आहे. 7

श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्यावसायिक संघ (मर्यादित) बाभळेश्वर तालूका श्रीरामपूर जि. अहमदनगर –कार्यपद्वती व समस्यांचा अभ्यास या एम्.फील. पदवी प्रबंधात श्रीरामपूर तालुक्यातील शेंतकऱ्यांची आर्थिंक स्थिती, त्यांच्याकडे असलेल्या गायी–म्हशींची संख्या,दूधाचे शासनाचे दर सहकारी दूध व्यावसायिक संघाची दूधाच्या दराबाबतची भूमिका, शेंतकऱ्यांचे प्रश्न या सर्वांचा आढावा घेवून समस्यांचा उहापोह केला आहे. 8

अहमदनगर जिल्हयातील संतपरंपरा व 20 व्या शतकातील संताचे कार्य या एम्.फील. पदवी प्रबंधात अहमदनगर जिल्हयातील संताच्या कामगिरीचा आढावा घेंतला असून श्रीरामपूर तालूक्यातील महानुभाव पंथाच्या कार्याची विस्तृत चर्चा करुन चक्रधरस्वामींच्या श्रीरामपूर तालुक्यातील वास्तव्याची व त्यांच्या श्रीरामपूर मुक्कामी असताना महानुभाव पंथाच्या प्रसार व प्रचाराचाही मागोवा घेंतला आहे. ९

अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगारांच्या आर्थ्िक आणि सामाजिक परिस्थितीचा चिकित्सक अभ्यास या एम्.फील. पदवी प्रबंधामध्ये जिल्हयातील माथाडी कामगारांच्या एकूण जीवनशैलीचा अभ्यास केला आहे. तसेच सदर प्रबंधात माथाडी कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी वेगवेगळया शिफारशी केल्या आहे. तसेच या कामगारांना मिळणारे वेतन,शंरीरिक कष्टापेक्षा कमी आहे,हे नमुद करुन ते आर्थिक दृष्टया कसे सक्षम होतील या विष्यी शिफारशी केल्या आहेत. 10

अहमदनगर जिल्हा नियोजन यंत्रणा आणि प्रक्रियेचा चिकित्सक अभ्यास या एम्.फील. पदवी प्रबंधात जिल्हा नियोजनाची रुपरेषा स्पष्ट केली आहे.तसेच जिल्हा नियोजन करताना तालुका पातळीवर कशा योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल.याचाही अभ्यास केलेला असून जिल्हा नियोजन यंत्रणा अधिकाधिक कशा प्रभावी करता येईल याबाबतची शिफारशीही केल्या आहेत. 11

अहमदनगर जिल्हयातील व्यापारी बॅकांची कृषि क्षेत्रात केलेल्या पतपुरवठयाचा

चिकित्सक अभ्यास या एम्.फील. पदवी प्रबंधात व्यापारी बॅकांच्या कार्यपद्वतीवर चर्चा करण्यात आली आहे.तसेच या व्यापारी बॅकांचे संचालकमंडळ त्यांचे भागधंरक या बद्दल माहिती दिलेली आहे.व्यापारी बॅकांनीही कृषी क्षेंत्रास जो पतपुरवठा केला आहे याचाही विस्तृत आढावा घेंवुन हा पतपुरवठा कमीत कमी व्याजदरात कसा करता येईल व कृषी क्षेंत्राचा जास्तीतजास्त विकास कसा करता येईल याविष्यी शिंफारशी केलेल्या आहेत. 12

सदर पीएच.डी. प्रबंधामध्ये चाकण ता. खेंड जि. पुणे या गावाचा स्थानिक इतिहास लिहिलेला आहे.या प्रबंधामध्ये चाकण या गावाचा प्राचीन ते आधुनिक काळापर्यंतचा इतिहास मांडला आहे. त्यामध्ये स्थानिक इतिहासातील छोटया छोटया बाबींचा समावेशं करुन स्थानिक इतिहास सुध्दा कसा एखंद्या दुर्लक्षीत बाबींकडे कसे लक्ष वेधूंन घेंतो हे स्पष्ट केलेले आहे.चाकणचा इतिहास हा प्रबंध स्थानिक इतिहासावर चांगला प्रकाश टाकणारा वाटतो. 13

सदर एम्.फील.प्रबंधात श्रीरामपूर शहरातील बाजारपेठेची सविस्तर माहिती दिली असून कापड दुकानांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. कापड मालकांच्याही अनेक समस्या असतात.त्यांना नगरपरिष्देकडून बऱ्याच अपेक्षा असतात यांवर ही प्रकाश टाकला आहे.कापड दुकानात नोकरी करणाऱ्या नोकरदारांचे वेतन,कामाचे

तास यांवरही अभ्यास केला असून नोकरदारांचे पगार त्यांच्या कामाचे तास यावरही शिफारशी केलेल्या आहेत. 14

सदर एम्.फील. प्रबंधत किरकोळ विक्रेता व ग्राहकाचा प्रतिसाद येवू घंतलेल्या मॉलबाबत कसा आहे याचा अभ्यास श्रीरामपूर शहरासाठी केला गेला आहे या प्रबंधात श्रीरामपूर शहराची बाजारपेठ बाजारपेठीतील एकूण उलाढाल श्रीरामपूर शहरातील नागरीकांची क्रयशक्ती यांचाही अभ्यास केलेला आहे. मॉल संस्कृतीमुळे किरकोळ विक्रेते व ग्राहकांमधील संबंधाबाबतही अभ्यासपुर्ण चर्चा केलेली आहे. 15

सदर एम्.फील. पदवी प्रबंधामध्ये मुळा प्रवरा वीज सहकारी सोसायटीचा अभ्यास केला आहे.सहकारी तत्वावर वीजपुरवठा करणारी ही संस्था असून महाराष्ट्रराज्य विद्युत मंडळाकडून वीज ध्ेंवुन श्रीरामपूर, राहुरी तालुक्याला ही संस्था वीज पुरवठा करीत आहे. या संस्थेचे ग्राहक विशेंषंतः शेंतकऱ्यांना वीजपंपाचा वीज पुरवठा कमी दरात करुन शेंतकऱ्यांच्या आर्थिक विकासात कसा वाटा उचलतील हेही स्पष्ट केले असून मुळा प्रवरा वीज संस्थेंचा कारभंर कार्यक्षम होण्यासाठी शिफारशी केल्या आहेत. 16

सदर एम.फील.पदवी प्रबंधमध्ये अहमदनगर शहराच्या एम.आय.डी.सी.चा सखेल अभ्यास केला असून स्थनिक इतिहासाचा अभ्यास कसा असतो याचा उत्तम नमुना आहे या प्रबंधत अहमदनगर शहराच्या एम.आय.डी.सी.मधील एकूण उद्योगांच्या

संख्या,उद्योगांचे वर्गीकरण केले असून उद्योगांची एकूण उलाढाल यांचीही आकडेवारी दिलेली आहे.तसेच कामगारांची संख्या त्यांच्या वेगवेगळया कामगार संघटना, कामगांराचे पगार, त्यांच्या कामाचे स्वरुप याविष्यी सविस्तर माहिती असून एम.आय. डी.सी.च्या विकासासाठी शिंफारशी केल्या आहेत.17

सदर पीएच.डी प्रबंधामध्ये अहमदनगर जिल्हा परिषदेचा इतिहास (1961–1991) या कालावधीचा अभ्यास केलेला आहे. या प्रबंधात अहमदनगर जिल्हा परिषदेची महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती पासूनची वाटचाल अभ्यासली आहे. तसेच अहमदनगर जिल्हा परिषदेच्या व जिल्हयातील सर्व पंचायत समित्यांच्या कामकाचा आढावा घेतला आहे. अहमदनगर जिल्हा परिषदेने केलेली लोकोपयोगी कार्ये विषद केलेली आहे. या संशोधनांतर्गत श्रीरामपूर तालुका समितीच्या कार्याचाही आढावा घेतला आहे.18

श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समिती,श्रीरामपूर, या एम. फील. पदवी प्रबंधात कृषी उत्पन्न बाजार समितीचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे . या संशोधनात त्यांनी श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समित्याची कार्यप्रणाली, आर्थिक उलाढाल, मालाची आवक जावक यांचे विश्लेषण केले आहे त्यातूनच त्यांनी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या मांडून शेतकरी व कृषी उत्पन्न बाजार समितीला सूचनाही केल्या आहेत. 19

श्रीरामपूर शहराचा उदय आणि विकास (1946 ते 1987) हा एम.फील. पदवी प्रबंधंत श्रीरामपूर शंहराचा इतिहास मांडला आहे . संबंधीत अभ्यासात श्रीरामपूर शंहर कसे आकाराला आले. त्यासाठी साखर कारखानदाचा कसा उपयोग झाला. शंहराच्या स्थापनेनंतर त्याचा किती वेगाने विकास झाला. शहराचे रूंद रस्ते, मोठे मोठे चौक, नगरपालिकेच्या विविध इमारती, यांचेही विवेचन केले आहे तसेच शहरातील प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा व महाविद्यालयांच्याही कार्याचा आढावा घेंतला आहे. 20

वऱ्हाडचा इतिहास या पीएच.डी प्रबंधामध्ये ‘वऱ्हाड’ च्या नावाचा उहापोह केला असून विदर्भातील आर्थिक परिस्थितीचा चिकित्सक अभ्यास केला आहे हा भाग नेहमी दुष्काळी असल्याने तेथीन शेतकऱ्यांच्या हाल अपेष्टांची कारुण्यपूर्ण वास्तविक माहितीही दिली आहे. तसेच तेथील शेतकऱ्यांना उर्जितावस्था प्राप्त व्हावी म्हणून सरकारला शिफारशी केल्या आहेत.तसेच त्यांनी विदर्भातील सामाजिक परिस्थितीचा आढावा देखैल प्रस्तुत संशोध्नात ध्ेंतला आहे. 21

ऐतिहासिक तेर, जिल्हा उस्मानाबाद या पीएच.डी प्रबंधामध्ये संशोधकाने उस्मानाबाद जिल्हयातील तेर तालूक्याचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. या प्रबंधात तेर तालुक्याची आर्थिक , सामाजिक, राजकीय, व शैक्षणिक माहिती विषद केली असून सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास केलेला आहे. तसेच तेर तालूक्याच्या विकासासाठी सरकारला मौलिक अशा शिफारशी केल्या आहेत. 22

महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हयाचा इतिहास या पीएच.डी प्रबंधात संशोधकाने चंद्रपूर जिल्हयातील सामाजिक स्थितीची चिकित्सा केली आहे. विशेषतः चंद्रपूर जिल्हयातील भौगोलिक स्थिती व तेथील समाज जीवनावर प्रामुख्याने प्रकाश टाकला आहे. तसेच चंद्रपूर जिल्हयातील आर्थिक परिस्थिती,उद्योगधंदे व शेतीचाही सखोल आढावा घेतला असून तेथील समस्या व त्यावर उपाय योजना सूचविल्या आहेत. 23 पंढरपुरचा इतिहास या एम.फील पदवी प्रबंधात संशोधकाने महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठ्ठलाच्या पुण्यनगरीचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. पंढरपुर हे तालुक्याचे ठिकाण असून महाराष्ट्रातील एक प्राचीन तीर्थक्षेत्रही आहे. महाराष्ट्रातील प्रमुखं तीर्थक्षेंत्र असलेल्या पंढरपुरच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक व राजकीय इतिहासावर दृष्टीक्षेंप टाकण्यात आला आहे. तीर्थक्षेंत्र म्हणुन झांलेला पंढरपुरचा कायापालट व त्याचे तेथील जनमाणसावरील परिणांम यांची चिकित्सा संशोधकाने केली आहे. 24

पुणे जिल्हयाचा अभ्यास, या पीएच.डी प्रबंधात संशोधकाने पुणे जिल्हा परिषंदेची वाटचाल ,पुण्याची आर्थिक औद्यौगिक प्रगती यांचा आढावा घेंतला आहे .पुणे जिल्हयातील कृषि व अन्य उद्योगध्ंदयाचाही अभ्यास प्रस्तुत संशोधंनात करण्यात आला आहे. पुणे जिल्हयातील सामाजिक आणि सांस्कृतीक इतिहासाचा आढावा घेंत त्यांनी

पुणे जिल्हयातील राजकीय स्थित्यंतराचा सखेल अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला आहे. 25

पश्चिम विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, या पीएच.डी प्रबंधात प्रस्तृत संशोधकाने सामाजिक जाणीवेचे भान ठेऊन अतिशय समतोलपणे दलित चळवळीचा आढावा घेतला आहे.पश्चिम विदर्भ हा दुष्काळी पट्टयातील भाग असल्याने तेथील आर्थिक स्थिती बेताचीच आहे. तेथील दलीत चळवळीचा अभ्यास करतांना दलितांना काही खास सवलती दयाव्यात अशाही शिफारशी केल्या आहेत. तेथील दलितांच्या वास्तविकतेवरही प्रकाश टाकाला आहे.26

वाकाटकांच्या मराठवाडयातील स्थळे व अवशेषांचा सांस्कृतीक अभ्यास, या पीएच.डी प्रबंधामध्ये मराठवाडयातील महत्वाच्या स्थळांचा चिकित्सक अभ्यास करतांना सांस्कृतीक अभ्यासावर भर देण्यात असला तरी मराठवाडयातील प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंतचा राजकीय, सामाजिक व आर्थिक इतिहासावरही पुरेपुर प्रकाश टाकला आहे. तसेच मराठवाडयातील तीर्थक्षेत्रांचीही तपशीलवार माहिती दिली आहे.27

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आंबेगांव तालुक्याचे योगदान, या शोध निबंधात पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुका हा आदिवासी व दुर्गम म्हणून ओळखला जातो. मात्र भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या इतिहासात आंबेगांव तालुक्याचे योगदान महत्वपुर्ण

असे होते. या तालुक्यातील अनेक लोकांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता. तसेच तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी सामाजिक राजकीय ,शैक्षणिक व आर्थिक जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. 28

तालुका शिरुर कासार जिल्हा बीड येथील मुलींच्या जन्मदराबाबत लिहिलेल्या शोध निबंधात शोध कर्त्याने शिरुर कासार तालुक्यातील मुलींचा जन्मदर हा तुलनेने बीड जिल्हयातील इतर तालुक्यापेक्षाही चांगला असुन हा जन्मदर इतर तालुक्यापेक्षा समाधानकारक का आहे, याचाही आढावा शोधनिबंधात घेऊन हा जन्मदर अधिकाधिक चांगला कसा होईल.यावर सकारात्मक भाष्य करुन त्यासंबंधीत काही सुचनाही केल्या आहेत. 29

सविनय कायदेभंग आंदोलनातील स्वदेशी बहिष्कार आंदोलन हे पुणे जिल्हयामध्ये कशा प्रकारे राबविले गेले त्यातून सविनय कायदेभंग चळवळीला ते कसे प्रेरक ठरले. व स्वदेशी बहिष्कार आंदोलन कसे परिणामकारक झाले ,याचा आढावा सदर शोध निबंधामध्ये घेण्याात आला आहे. शिवाय स्वदेशी आंदोलनामुळे काही प्रमाणात कसा रोजगार उपलब्ध झाला याचेही चिकित्सक विवेचन केले आहे.30
अळकुटी तालुका पारनेर येथील गोंधळी समाजाचे ऐतिहासिक योगदान या शोध निबंधामध्ये शोध कर्त्याने गोंधळी समाजाचा सांस्कृतीक व धार्मिक वारसा विषद केला असून गोंधळी समाज व तुळजापूरची आंबाबाई यांचा संबंध स्पष्ट करुन महाराष्ट्रात

लग्नसमारंभानंतर जागरण–गोंधळाची परंपरा कशी आहे,हेही स्पष्ट करतांनाच गोंधळासाठी गोंधळी समाजाचे योगदानही स्पष्ट केले आहे. 31

स्थानिक इतिहास–विशेष संदर्भ इंदापुर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान या शोध निबंधामध्ये इंदापूर तालुका जिल्हा पुणे येथील स्थानिक इतिहासाचा आढावा घेउन ग्रामविकासातील जिल्हा परिषद, पंचायात समिती यांचा किती मोठा वाटा आहे. हे स्पष्ट करुन अधिकाधिक ग्रामविकास साधावयाचा असेल तर आर्थिक तरतुदही भरीव स्वरुपाची असावी असे सुचविले आहे.32

समर्थ भारत अभियान अतंर्गत दत्तक गावांचा इतिहास पुणे विद्यापीठाने प्रकाशित केला आहे. पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रिय सेवा योजने अंतर्गत प्रत्येक महाविद्यालयाने एक गाव दत्तक घेउन त्या गावाचा स्थानिक इतिहास लिहिला आहे. हा स्थानिक इतिहासाचा उत्तम नमूना आहे कारण ही गावे अगदीच छोटी गावे आहेत तरीही ऐतिहासिक महत्व लक्षात घेउन राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत एक चांगला उपक्रम पार पाडला गेला आहे. 33

संगमनेर शहराचा इतिहास हा आखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेतील शोध निबंध आहे.संगमनेर शहराचा इतिहास हा स्थानिक इतिहासाचे एक उत्तम उदाहरण आहे. या शोध निबंधात शोध कर्त्याने संगमनेर शहराची ऐतिहासिक माहिती विषद करुन संगमनेर शहराची आर्थिक सामाजिक, शैक्षणिक स्थितीचाही आढावा घेउन एक

चिकित्सक अभ्यास मांडलेला आहे.[34]

सदर पीएच.डी प्रबंधामध्ये मराठवाडयाचे जनव्यवस्थापन अभ्यासतांना अभ्यासकाने मध्ययुगीनकाळातील मराठवाडयाचा स्थानिक इतिहास मांडला आहे. त्यामध्ये मराठवाडयाचा औद्योगिक व आर्थिकदृष्टया मागासलेपणा कसा आहे. हे विषद करतांनाच सांस्कृतीकदृष्टया मराठवाडयाला किती चांगला वारसा लाभला आहे हे ही स्पष्ट केले आहे.[35]

प्रस्रस्तुत संशंशोध्ध्नाची उदिष्टे :–

1) श्रीरामपुर तालुक्याच्या विकासासाठी राबविलेल्या गेलेल्या सरकारी योजनांचा आढावा घेंणें.

2) श्रीरामपुरच्या तालुक्याच्या स्थंनिक स्वराज्य संस्थंच्या वाटचालीचं आढावा घेंणें.

3) श्रीरामपुर तालुक्याच्या उद्योगध्ंदयांच्या वाटचालीचा आढावा घेंणें.

4) श्रीरामपुर तालुक्याच्या शेंतीविष्यक प्रगतीचा आढावा घेंणें.

5) श्रीरामपुर तालुक्याच्या विविधं सामाजिक संस्थंच्या कार्याचा आढावा घेंणें.

6) श्रीरामपुर तालुक्याच्या राजकीय इतिहासाचा आढावा घेंणें.

7) श्रीरामपुर तालुक्याच्या शैंक्षंणीक प्रगतीचा आढावा घेंणें

संभावित प्रकरण योजना ,संशोधंनाची कार्यर्पपद्धतीः

संभावित प्रकरण योजना

प्रकरणं 1 – प्रास्ताविक

1 विषंय निवडण्याचे कारण

1.2 विषंयाची उदिष्टये

1.3 विषंयाची व्याप्ती

1.4 अभ्यासाची संशोध्ंन पद्वती

1.4 अभ्यासाची गरज

1.5 संबंधित साहित्याचा आढावा

प्रकरण.2– श्रीरामपूर तालुक्याची सामाजिक व राजकीय स्थिंती

प्रास्ताविक

2.1 श्रीरामपूर तालुका– भैगोलिक

2.2 श्रीरामपूर शंहर–नगरपरिष्ंदेचे कार्य

2.3 श्रीरामपूर तालुक्याची सामाजिक स्थ्िंती

2.4 लोकसंख्या–संवर्ग (जाती जमाती)

2.5 श्रीरामपूर तालुक्याची राजकीय स्थ्िंती

प्रकरण.3 –श्रीरामपूर तालुक्याची आर्थिंक स्थ्िंती

प्रास्ताविक

3.1 श्रीरामपूर पंचायत समिती

3.2 श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समिती

3.3 श्रीरामपूर मर्चन्ट असोसिएशन

3.4 श्रीरामपुर तहसील कार्यालय

3.5 खाजगी व सहकार साखर कारखंने

3.6 श्रीरामपूर एम.आय.डी.सी20

प्रकरणं.4 – श्रीरामपूर तालुक्याची शैक्षणिक परिस्थिती

प्रास्ताविक

4.1 तालुक्यातील प्राथंमिक शिक्षण

4.2 तालुक्यातील माध्यमिक शिंक्षण

4.3 तालुक्यातील उच्च शिक्षण

4.4 व्यावसायिक शिक्षण

प्रकरणं5 – उपसंहार

5.1 मूल्यमापन

5.2 शिफारशी

5.3 निष्कर्ष

संशोधंन कार्य पद्धती :

प्रस्तुत संशेध्ंन हे वर्णनात्मक पद्धतीचे असून ते ऐतिहासिक संशोधंन पद्धतीनुसार मांडले जाणार आहे. या अंतर्गत श्रीरामपुर तालुक्यातील गतकालीन घ्टनांचा अभ्यास केला जाणंर आहे.

त्यात प्रामुख्याने दस्तऐवज विश्लेष्णं, नोंदी, मुलाख्ती , निरीक्ष्ंं यांचा अवलंब करून श्रीरामपुर तालुक्याची राजकीय, सामाजिक, आर्थ्कि व शैंक्ष्णीक माहिती प्रथम संकलित करणंर आहे .त्यानंतर त्या माहितीचे विश्लेष्ंन करून त्याआधंरे अहवाल लेख्ंन, निष्कर्ष व शिंफारशी केल्या जाणार आहेतप्रस्तुत

संशेध्नात अभ्यासासाठी श्रीरामपुर नगरपरिष्द, श्रीरामपुर पंचायत समिती, श्रीरामपुर मर्चंट असोसिएश्ंन, औद्यौगिक वसाहत, दवाखंने, सामाजिक संस्थं, सुतगिरणी, कृषि उत्पन्न बाजार समिती, सरकारी कार्यालय, रेल्वे स्टेश्ंन, शंळा, महाविद्यालय इत्यादींना भ्ेंटी देउन माहिती संकलित करण्यात येणंर आहे. त्या माहितीची शास्त्रीयदृष्टया चिकित्सा करण्यात येईलमाहिती

संकलित करतांना विविधं कार्यालय, संध्टना, स्ंस्थंमधील नोंद वहया, वार्षिक अहवाल , स्मरणीका, वृत्तपत्रांची कात्रणें, गौरव ग्रंथं, आत्मचरित्र, बैठकांचें अहवाल, ताळेबंद, मासिके यांचा उपयोग केला जाणंर आहे

संशेध्संश्ंशेध्ध्ंनाची साध्ंने :

अव्वल साध्ंने – विविधं संस्थंच्या नोंद वहया, ताळेबंद ,मिटिंग प्रोसिडींग बुक, वार्षिक अहवाल .

दुय्यम साध्ंने – गॅझेटियर, मासिके , वृत्तपत्रे, गौरव ग्रंथं ,आत्मवृत्त ,मुलाखंती, स्मरणीका, विविध संस्थांचे व संघटनांचे वार्षिक अंकवरील सर्व साधंनातुन तथ्य शंोधंन करतांना सर्वच कागदपत्रांचे अंतरंग व बहिरंग परिक्षण करून सत्य स्थिती मांडली जाणार आहे

व्याप्तीः–

प्रस्तुत संशोधंनाचा अभ्यास हा श्रीरामपुर तालुक्याच्या इतिहासाचा अभ्यास होय. श्रीरामपुर तालुक्याच्या सामाजिक,आर्थिक,राजकीय व शैंक्षणीक वाटचालीचा अभ्यास प्रस्तुत संशेधनात करण्यात येणंर आहे. प्रस्तुत संशोधनात श्रीरामपुर तालुक्याच्या स्वातंत्र्यौत्तर काळापासून म्हणजे सन 1947 पासून सन 2007 पर्यंतचा इतिहास अभ्यासला जाणंर आहे .

संशोधंनाचे महत्वः

प्रस्तुत संशेधनातुन श्रीरामपुर तालुक्याच्या इतिहासाविष्यी वेगवेगळया प्रकारची माहिती मिळु शकते प्रस्तुत संशेध्नाचे ठळक महत्व पुढील प्रमाणे.–

1 श्रीरामपुर तालुक्यातील राजकीय स्थित्यंतरे समजून घ्ेंता येतील.

2 श्रीरामपुर तालुक्यातील स्थंनिक स्वराज्य संस्थंची वाटचाल जाणूंन घ्ेंता येईल.

3 श्रीरामपुर तालुक्यात राबविलेल्या विविधं सरकारी योजनांचा आढावा घ्ेंता येईल .

4 श्रीरामपुर तालुक्यातील सामाजिक स्थिती समजून घेता येईल.

5 श्रीरामपुर तालुक्यातील अर्थव्यवस्था समजून घेता येईल .

6 श्रीरामपूर तालुक्यातील शेती व उद्योग धंदे व व्यवसायाचा आढावा घेता येईल.

7 श्रीरामपूर तालुक्यातील सहकारी संस्थांची वाटचाल जाणून घेता येईल.

8 श्रीरामपुर तालुक्याचा स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणीक प्रगतीचा आढावा घेता येईल

9 . श्रीरामपुर तालुक्यातील नागरीकरणाच्या समस्या जाणून घेता येतील.

10. श्रीरामपुर तालुक्याच्या भवीकाळातील वाटचालीस उपयुक्त ठरतील अशा सूचना करता येतील

परिमर्यादा :

1) प्रस्तुत संशोधनात श्रीरामपुर तालुक्याच्या स्वातंत्र्योत्तर काळातील, इ.स. 1947 ते 2007 पर्यंतचा इतिहास विचारात घेतला आहे.

2) प्रस्तुत संशोधन हे श्रीरामपुर तालुक्याच्या राजकीय,सामाजिक ,आर्थिक व शैक्षणीक इतिहासापुरते मर्यादीत आहे

संदर्भ सूची

1. जगताप धंनसिंग,(1995), महाराष्ट्रातील ग्रामीण भंगातील नागरकेंद्राचा उदय,बारामती एक अभ्यास, पुणे, विदयापीठ पुणे.

2 .बोर्डे अभिंजित ,(2010), कृषि उत्पन्न बाजार समिती,श्रीरामपूर . पुणे, विदयापीठ पुणे .

3. जगताप निता, (2002), भंरतातील सहकारी चळवळीची ऐतिहासिक मिमांसा, महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हयाचा विशेष संदर्भ, पुणे, विद्यापीठ पुणे .

4. गायकवाड लहु ,(2011),जुन्नरचा इतिहास (प्राचीन ते अर्वाचीन), पुणे, विद्यापीठ पुणे . महाविद्यालय

5. कासलीवाल सुप्रिया , (2005), अशेक सहकारी बॅंक लि. श्रीरामपूर, एक विश्लेष्णंत्मक अभ्यास, पुणे, विद्यापीठ पुणे .

6. खर्डे विजय , (2010), नागरी सहकारी बॅंकाचे विश्लेष्नात्मक अध्ययन

(विशेंष संदर्भ- अहमदनगर जिल्हा) पुणे, विद्यापीठ पुणे .

7. गुजर रविंद्र , (2009), श्रीरामपूर तालुक्यातील कृषि विपण्नाच्या समस्यांचा एक चिकित्सक अभ्यास, पुणे ,विद्यापीठ पुणे.

8. घेटेकर डी.बी , (1993),श्रीरामपूर दूधं जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूधं व्यावसायिक संधं (मर्यादित),बाभ्ळेश्वर ता.श्रीरामपूर जि. अहमदनगर कार्य पद्वती व समस्यांचा अभ्यास,नागपूर, विद्यापीठ नागपूर.

9. जाधंव हरिदास शंकर ,(2000),अहमदनगर जिल्हयातील संतपरंपरा व 20 व्या शंतकातील संतांचे कार्य, पुणे, विद्यापीठ पुणे .

10.कांबळे अनिल गणपत ,(2010) ,अहमदनगर जिल्हयातील माथंडी कामगारांचा आर्थिक आणिं सामाजिक परिस्थितीचा चिकित्सक अभ्यास, पुणे, विद्यापीठ पुणे .

11. विखें प्रविणं भंऊसाहेब, (2012), अहमदनगर जिल्हा नियोजन यंत्रणं आणिं प्रक्रियेचा चिकित्सक अभ्यास, पुणे , विद्यापीठ पुणें.

12. पवार नाना चंद्रभंन, (2011),अहमदनगर जिल्हयातील व्यापारी बँकांनी कृषि क्षेंत्रात केलेल्या पतपुरवठयाचा चिकित्सक अभ्यास, पुणे, विद्यापीठ पुणे .

13. गोर्डे विलास सोमा ,(2011), चाकणं ता.खेंड गावचा स्थंनिक इतिहास (प्राचीन ते आधुंनिक) ,पुणे,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.

14- Tekawade S.P. ,(2009),A Study Of Retal Marketing In Shrirampur City

With Refernce To Cloth Market, Pune, University Pune.

15- Kathuriya S.T., (2009),Retailers and Consumers Response to Upcoming Malls, (A Case Study of Shrirampur Town),Pune , University Pune.

16- Barhate G.H. ,(1989),The Mula-Pravara Electric Co-Opretive Society Limited, Shrirampur, (District-Ahmednagar),A Case Study,Kolhapur, Shivaji University.

17- Tajne U.A., (2009),A Study of Maharashtra Indstrial Development Corporation, (M.I.D.C.), With Special Refrence To Ahmednagar City, Pune ,University Pune.

18. खिलारी एस.पी., (2011),अहमदनगर जिल्हा परिषदेचा इतिहास (1961 ते 1991) ,पुणे ,विद्यापीठ पुणे.

19. तुपे बी.जी. ,(2008), श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा चिकित्सक अभ्यास ,पुणे, विद्यापीठ पुणे16

20.बढे बी.एल., (1992), श्रीरामपूर शहराचा उदय आणि विकास 1946 ते 1987,पुणे, विद्यापीठ पुणे.

21. काळे वाय. एम. ,(1993), वऱ्हाडचा इतिहास ,नागपूर, विद्यापीठ नागपूर.

22. मनाळे नानासाहेब ,(2011), ऐतिहासिक तेर जिल्हा उस्मानाबाद,पुणे, टिळक

महाराष्ट्र विद्यापीठ.

23. राजूरकर बी.वाय., (1990), चंद्रपूर जिल्हयाचा इतिहास ,नागपूर, विद्यापीठ नागपूर.

24. नरवणे पी.एस., (2002), पंढरपूरचा इतिहास ,कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ.

25. इंगोले टि.एस., (1995), पुणे जिल्हा परिषदेची वाटचाल ,पुणे, विद्यापीठ पुणे.

26. म्हस्के बी. आर. ,(2008), पश्चिम विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास,अमरावती,विद्यापीठ अमरावती.

27. गव्हाणे के. व्ही., (2011), वाकाटकांच्या मराठवाडयातील स्थळे व अवशेषांचा सांस्कृतीक अभ्यास ,पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.

28. डॉ.मोकाटे एन.आर. ,(2010) ,भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आंबेगांव तालुक्याचे योगदान,शोध निंबंध संग्रह खंड–1 प्रकाशन,पुणे विद्यापीठ इतिहास परिषद पुणे,पान नं. 81 ते 84.

29- Dr. Donglikar C.V., Oct 2012, Valuation of Female Birth in Taluka Shirur Kasar Dist.Beed, Shodhankan, Vol-1, Issue-4,ISSN-2250-0383, प्रथमेश पब्लिकेशन, अहमदनगर,पान नं. 16 ते 19-

30. डॉ.फडतरे बी.जी. ,सविनय कायदेभंग आंदोलनातील स्वदेशी बहिष्कार आंदोलन पुणे जिल्हा, कित्ता–1,पान नं. 75 ते 78 .

31. डॉ. गोर्डे व्ही.एस.,अळकुटी तालुका पारनेर येथील गोंधळी समाजाचे ऐतिहासिक योगदान, कित्ता–2,पान नं. 102 ते 106.

32. काझी एच.यु. ,जूलै (2012), स्थानिक इतिहास – विशेष संदर्भ इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान, .कित्ता –3,पान नं. 234 ते 241.

33. डॉ. जाधव नरेंद्र ,(कुलगुरु),(2009),दत्तक गावांचा इतिहास, समर्थ भारत अभियान,प्रकाशन कुलसचिव पुणे विद्यापीठ, गणेशखींड पुणे, एकूण पाने 156.

34. डॉ.राजदेव टि.बी. ,डिसेंबर (2012), संगमनेर शहराचा इतिहास ,आखिल महाराष्ट्र इतिहास परिषद संशोधन पत्रिका,प्रकाशन डॉ.मिनाक्षी वाय.कोळे भूसावळ ,पान नं. 227 ते 237.

35. साबळे पी.ए. ,(2011), मध्ययुगीन मराठवाडयाचे जनव्यवस्थापन, औरंगाबाद,डॉ.बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ

संदर्भ ग्रंथ यादी

1 भंरतीय जनगणंना ,1981 ,जिल्हा जनगण्ंना निर्देशं ग्रंथं ,(1986), अहमदनगर.

2 महाराष्ट्र शंसन अहमदनगर गॅझेट–1976.

3 देशंपांडे चं. ḍुं.,(1987), शंहरे भैगोलिक विश्लेष्ंन ,पुणे,कॉन्टीनेन्टल प्रकाशन.

4 दास्ताने संतोंषं, (2003) ,महाराष्ट्र, पुणे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी.

5 गायकवाड सरदेसाई हनमाने ,(1989), इतिहास लेख्ंन शंस्त्र, कोल्हापुर,फडके प्रकाशंन .

6 संत दु. का., (2007), संशेध्ंन पद्धती ,प्रक्रिया व अतरंग ,पुणें,पुणें विदयार्थी गृह प्रकाशन.

7 डॉ. रोडे सोमनाथं,(1999), मराठवाडयाचा इतिहास,औरंगाबाद,विद्या बुक्स पब्लिशंर्स .

8. तापकीर साबळे ,(2003), संशेधंन पद्धती व प्रकल्प अहवाल ,पुणें ,निराली प्रकाशंन .

9.http://663studygroup.pbworks.com/w/page/1050528/Chapter%2016%20Historical%20Research

10.http://www.firstfoundation.in/MyVillage/AhmednagarD/shrirampurGP.htm#Free_&_Open_to_All_Forum

11. http://en.wikipedia.org/wiki/Villages_in_Shrirampur_taluka

12. www.firstfoundation.in/MyVillage/AhmednagarD/shrirampurGP.htm

13 en.wikipedia.org/wiki/Shrirampur_taluka